**पोलीस उप-आयुक्त , वाहतूक शाखा कार्यालय, पिंपरी चिंचवड.**
शहीद अशोक कामठे पीएमपीएमएल बस थांबा ,व्यापारी संकुल ,पहिला मजला,
चिंचवडगाव , चिंचवड पुणे ४११०३३ फोन क्र.०२०-१७६१००१५/१६
ई-मेल आयडी - piplanning.pcpc-mh@gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.पोउआ/वाहतूक पिं.चिं./ अं.कक्ष/ महा ट्राफिक ॲप /432318 /२०२३ , पिंपरी चिंचवड. दिनांक - १३/१०/२०२३

# प्रेसनोट

<u>विषय :- महा ट्राफिक (MahaTrafficapp) ॲप डाऊनलोड करणे बाबत .</u>

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, महाराष्ट्र पोलीस दलाकडून वाहतूक नियमांचे अनुषंगाने **(MahaTrafficapp)**महा ट्राफिक ॲप उपलब्ध करण्यात आले आहे. मोबाईल मध्ये सदर ॲप डाऊनलोड करून घ्यावे . त्यात मोबाईल क्रमांक वाहन क्रमांक आदी माहिती नमूद करावी सदर ॲप द्वारे खालील माहिती मिळणार आहे.

१) आपल्या वाहनावर किती चलन प्रलंबित आहेत.

२) आपल्या वाहनावर कोणत्या ठिकाणी व कोणत्या कलमान्वये ई चलन झालेले आहे.

३) ॲप मध्ये सदर दंड भरण्याची तरतूद करण्यात आलेली आहे .( फोन पे अथवा गुगल पे द्वारे दंड भरू नये व्यवहार पूर्ण होत नाही , **कार्डद्वारे पेमेंट करावे**.)

४) दंडाची रक्कम भरली असल्यास त्याचा तपशील ही मिळतो.

५) चुकीचे ई चलन झाले असेल तर आपण ॲप मधील **(Grievance Option)** ग्रेवीयन्स ऑप्शन द्वारे तक्रार करू शकता.

६) इन्फॉर्मेशन ऑप्शन **( Information Option )** द्वारे कोणत्या कलमासाठी किती दंड आहे याची माहिती मिळेल.

७) महा ट्राफिक ॲप हे गुगल प्ले स्टोअर वर उपलब्ध आहे तसेच युट्युब वर ॲप हाताळणे बाबतचे व्हिडिओज उपलब्ध आहेत.

८)ॲप बाबत अधिक माहितीसाठी हेल्पलाइन संपर्क क्रमांक ८४४८४४८९६० वर संपर्क साधावा. वाहतूक नियमांचे दृष्टीने खास करून महामार्गावर वेग मर्यादा ओळखणारे स्पीड डिटेक्टिव्ह कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. सदर कॅमेरे यांची बऱ्याच नागरिकांना माहिती नसते. त्यामुळे आपल्या वाहनांवरती अशा प्रकारचे आपले नकळत चलन होतात. तसेच पिंपरी चिंचवड शहरात सीसीटीव्ही बसविण्यात आलेले आहेत. त्याद्वारे कमांडिंग रूम मधून वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहन चालकावर दंड आकारण्यात येतो , याची कल्पना बहुतेक जणांना नसते त्यामुळे आपले नकळत आपल्या वाहनावर ई-चलन झालेले असते .

तरी सर्व नागरिकांनी **(MahaTrafficapp)** महा ट्राफिक ॲप मोबाईल मध्ये डाऊनलोड करून त्यामध्ये असणाऱ्या सुविधांची माहिती घ्यावी . वाहतूक नियमांचे पालन करावे . दंड होणार नाही याची दक्षता घ्यावी .तसेच आपल्या वाहनांवर पेंडिंग चलन असल्यास जवळच्या वाहतूक पोलिसांकडे जाऊन दंड भरावा.

(बापु बांगर )
पोलीस उप-आयुक्त ,
वाहतूक शाखा , पिंपरी चिंचवड